# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 17/02/2020 (सोमवार)
# (सकाळ)

---

## कोळसा चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 7 कि.मी अंतरावर गोंडेगाव खदान मधील एचओ ईडंपींगच्या मागे घाटरोहणा रोड कन्हान येथे दिनांक 16/02/2020 चे 03:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मेहुल प्रभाकर लेंढे, वय 22 वर्ष, रा. गोंडेगाव व साक्षीदार हे गोंडेगाव ओपन कास्ट येथे पेट्रोलींगची डयुटी करीत होते. दरम्यान यातील आरोपी क्र. 1) बालचंद हरीराम बिलोने, वय 55 वर्ष, रा. वार्ड क्र 05 कांद्री कन्हान व 2) शेख ईस्माईल शेख मतीन, वय 27 वर्ष, रा. पिपळा दहीगुडा आंबेजोगाई जि. बिड या दोन्ही आरोपीतांनी आरोपी 3) उमेश पानतावने, रा. कन्हान याच्या सांगण्यावरुन संगणमत करुन गोंडेगाव ओपन कास्टचा खदान येथील डब्लु.सी.एल चा अंदाजे 12 टन दगडी कोळसा 4,000/–रु. प्रती टन 48,000/–रु. चा माल चोरुन त्यांच्या ताब्यातील एम.एच.–18/बी.इ. –5745 क्रमांकाच्या 12 चाकी ट्रकमध्ये भरुन परळी येथे विकण्यासाठी घेवुन जात असतांना फिर्यादी व त्याचे सोबत डयुटीवर असलेले साक्षदार यांना मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34, 109 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक शेख 9403692766 हे करीत आहे.

## दुखापत

1) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 02 कि.मी अंतरावर मौजा बोरूजवाडा येथे दिनांक 14/02/2020 चे 11:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अक्षय काशिनाथ पुसदकर, वय 21 वर्ष, रा. बोरूजवाडा सावनेर हे गावातील कायक्रमावरून घरी जात होते. दरम्यान फिर्यादीने आरोपी क्र. 1) धनराज निंबाळकर व 2) राहुल मानकर, दोन्ही रा. सावनेर यांना ''रस्त्यात डोलडालत का चालता, बरोबर चला'' असे हटकले असता आरोपी क्र. 1 व 2 यांनी संगनमत करून फिर्यादीस तुच दारू पिवून आहेस असे म्हणुन आरोपीतांनी रस्त्यातील काडी उचलून फियादीचे डोळयाच्या भोइवर मारले व हातबुक्कीने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम 324, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक प्रकाश नांदुरकर 8605381590 हे करीत आहे.

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावर दिघोरी ता. कामठी मौदा येथे दिनांक 16/02/2020 चे 10:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ पुष्पा अवचीत मेश्राम, वय 45 वर्ष, रा. दिघोरी ता कामठी मौदा व आरोपी नामे– रवि मानिकराम माळवे रा दिघोरी ता कामठी हे दोघही सासु जावई आहेत. फिर्यादीने मुलीला व नातीनला कपडे घेन्याकरीता नेत आहे, असे म्हटले असता आरोपीने मला तुम्हचे कपडे पाहीजे नाहीत. असे म्हणुन ढकलढुकल करून काठी धरून मारायला  धावला असता फिर्यादीची लहान मुलगी मध्ये आल्याने तीच्या डोक्यावर काठी मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जंगवाड 8329948101 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर  जिल्हा (ग्रामीण), नागपूर